सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

## सन १९५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६

# सर ससून जेकब डेव्हिड बॅरोनसी (रद्द करण्याबाबत) अधिनियम, १९५७

(दिनांक ३ जुलै, २००६ पर्यंत सुधारित)

## Bombay Act No. XXXVI of 1957

# The Sir Sassoon Jacob David Baronetcy (Repealing) Act, 1957

*(As modified upto 3rd July, 2006)*

*****

**व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित.**

२०१२

**[किंमत रु.      ]**

# सर ससून जेकब डेव्हिड बॅरोनसी (रद्द करण्याबाबत) अधिनियम, १९५७

**(सन १९५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६)**

## अनुक्रमणिका

**उद्देशिका.**

**कलमे.** **पृष्ठ**


१. संक्षिप्त नाव आणि प्रारंभ. .. .. .. १

२. विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता विद्यमान बॅरोनेटकडे निहित होणे आणि १९५० चा अधिनियम क्रमांक २ रद्द करणे. .. .. १

३. कॉर्पोरेशन आणि विश्वस्त यांना दिलेली हमी. .. .. .. २

४. शासनाला आणि अधिकाऱ्यांना दिलेली हमी. .. .. .. २

# सन १९५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३६[१]

## [ सर ससून जेकब डेव्हिड बॅरोनसी (रद्द करण्याबाबत) अधिनियम, १९५७ ]

**[ २६ सप्टेंबर, १९५७ ]**

## सर ससून जेकब डेव्हिड बॅरोनसी अधिनियम, १९१५ रद्द करण्याबाबत अधिनियम

१९१५ चा २. **ज्याअर्थी,** सर ससून जेकब डेव्हिड बॅरोनसी अधिनियम, १९१५ हा, दिवंगत सर ससून जेकब डेव्हिड बॅरोनेट यांच्या, तारणपत्रांच्या स्वरुपात असलेल्या विवक्षित मालमत्तेची, त्यांनी किंवा त्यांना कायदेशीर रीतीने झालेल्या किंवा होणाऱ्या पुरुष वारसांनी धारण करण्यासाठी बादशहा पंचम जॉर्ज यांनी बहाल केलेली बॅरोनेटची पदवी व प्रतिष्ठा कायम रहावी व त्याच्या पुष्ट्यर्थ असावी म्हणून विश्वस्तव्यवस्था करून ठेवण्यासाठी आणि त्याच्याशी संबंध असलेल्या इतर कारणासाठी अधिनियमित करण्यात आला होता ;

**आणि ज्याअर्थी,** विद्यमान बॅरोनेट यांनी, उक्त अधिनियमाअन्वये निर्माण केलेली विश्वस्तव्यवस्था रद्द व नष्ट करण्यात यावी आणि उक्त अधिनियम रद्द करण्यात यावा असे मुंबई सरकारला सुचविले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त विश्वस्तव्यवस्था रद्द व नष्ट करणे आणि उक्त विश्वस्तव्यवस्थेची सर्व मालमत्ता विद्यमान बॅरोनेटकडे हस्तांतरित करणे व त्या कारणांकरिता उपरिनिर्दिष्ट अधिनियम रद्द करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या आठव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, सर ससून जेकब डेव्हिड बॅरोनसी (रद्द करण्याबाबत) अधिनियम, १९५७ असे म्हणावे. **संक्षिप्त नाव आणि प्रारंभ.**

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

**२.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभापासून,—

**विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता विद्यमान बॅरोनेटकडे निहित होणे आणि १९१५ चा अधिनियम क्रमांक २ रद्द करणे.**

१९१५ चा २. (अ) सर ससून जेकब डेव्हिड बॅरोनसी अधिनियम, १९१५ (ज्याचा यात यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख करण्यात आला आहे), याअन्वये निर्माण केलेली विश्वस्तव्यवस्था रद्द व नष्ट करण्यात येईल व याद्वारे रद्द व नष्ट करण्यात आली आहे ;

(ब) उक्त अधिनियमाअन्वये कॉर्पोरेशनकडे निहित असलेली (स्टॉक्स, निधी, तारणपत्रे आणि पैसे आणि गुंतविलेल्या रकमा धरून) सर्व जंगम व स्थावर मालमत्ता ही, या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, विद्यमान बॅरोनेटकडे (ज्याचा यात यापुढे "बॅरोनेट" असा उल्लेख केला आहे) हस्तांतरित झाली आहे असे समजले पाहिजे आणि तिचे आणखी हस्तांतरण पत्र वगैरे न करता ती मालमत्ता त्याच्याकडे निहित होईल ;

(क) उक्त अधिनियमाअन्वये "सर ससून जेकब डेव्हिड बॅरोनसी यांचे विश्वस्त" (ज्यांस या अधिनियमात "कॉर्पोरेशन" असे म्हटल आहे) या हुद्याखाली व नावाखाली रचना केलेल्या कॉर्पोरेशनचे सर्व हक्क, जबाबदाऱ्या आणि बंधने, मग ती करारामधून उद्‌भवलेली असोत किंवा इतर रीतीने उद्‌भवलेली असोत, बॅरोनेटचे हक्क, जबाबदाऱ्या आणि बंधने आहेत असे समजले पाहिजे ;

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन याकरिता मुंबई शासन राजपत्र, १९५७, भाग पाच, इं. पृष्ठ १०६ पहा.

(ड) कॉर्पोरेशनबरोबर केलेले सर्व करार, आणि तिच्यावतीने केलेले सर्व संलेख, बॅरोनेटबरोबर किंवा बॅरोनेटच्या वतीने केले आहेत असे समजले पाहिजे आणि त्याप्रमाणे ते अंमलात येतील ;

(इ) ज्यात किंवा ज्यास कॉर्पोरेशन ही एक पक्षकार असेल त्या, या अधिनियमाच्या प्रारंभी अनिर्णित असलेल्या सर्व दाव्यात व कायद्याच्या कामकाजात बॅरोनेट हा कॉर्पोरेशनच्या ऐवजी पक्षकार आहे असे समजण्यात आले पाहिजे ;

(फ) कॉर्पोरेशनचे विघटन करण्यात येईल व याद्वारे ते करण्यात येत आहे आणि ती काम करण्याचे बंद होईल ;

(ग) सर ससून जेकब डेव्हिड बॅरोनसी अधिनियम, १९१५ हा याद्वारे रद्द करण्यात आला आहे.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही मजकुरामुळे, पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये उल्लेख केलेल्या मालमत्तेचा जो कोणताही हक्क किंवा तीतील जो कोणताही हितसंबंध बॅरोनेट किंवा त्याचे वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी याविरूध्द कायद्यानुसार अंमलात आणण्याचा कोणत्याही व्यक्तीस, संस्थेस किंवा प्राधिकाऱ्यास हक्क असेल, त्या हक्कास किंवा हितसंबंधास (योग्य रीतीने नेमून दिलेले किंवा आकारलेले स्त्रीधन धरून) बाध येणार नाही.

**कॉर्पोरेशन आणि विश्वस्त यांना दिलेली हमी.**

**३.** उक्त अधिनियमात किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही असले तरी, कॉर्पोरेशन आणि तिच्या विश्वस्तापैकी जो विश्वस्त, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, उक्त अधिनियमांच्या तरतुदींनुसार त्या वेळी अशा विश्वस्ताच्या हुद्याच्या जागेवर होता किंवा असेल असा प्रत्येक विश्वस्त, अशा विश्वस्तांपैकी प्रत्येक विश्वस्ताचे वारस, मृत्युपत्राबरहुकूम व्यवस्था करणारे आणि वहिवाटदार, त्यांच्या इस्टेटी व चीजवस्तू आणि अशा विश्वस्तांनंतर हुद्दा धारण करणारे यांना उक्त अधिनियमाच्या तरतुदीअन्वये करणे आवश्यक असलेली कोणतीही गोष्ट कॉर्पोरेशन किंवा विश्वस्त यांनी करण्यात कसूर केल्याबद्दल किंवा वर्जिल्याबद्दल किंवा त्या संबंधात सर्व हिशोब, दावे किंवा इतर कायदेशीर इलाज, मागणीहक्क व मागण्या-- मग त्या कोणत्याही असोत-- यांतून आणि उक्त अधिनियमाच्या तरतुदींअन्वये किंवा त्यानुसार सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृत्याबद्दलची कोणतीही जबाबदारी हीतून याद्वारे संयुक्तपणे आणि पृथक्‌पणे मुक्त करण्यात येत आहे ; आणि त्यानुसार उक्त कॉर्पोरेशन किंवा उक्त विश्वस्त, वारस, मृत्युपत्राबरहुकूम व्यवस्था करणारे, वहिवाटदार इस्टेटी, चीजवस्तू किंवा उत्तराधिकारी यांच्यापैकी कोणतेही विश्वस्त, वारस, मृत्युपत्राबरहुकूम व्यवस्था करणारे, वहिवाटदार, इस्टेटी, चीजवस्तू किंवा उत्तराधिकारी यांविरुध्द, अशी कोणतीही कसुरी, वर्जन किंवा कृत्य यांबद्दल किंवा त्यासंबंधात, कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर इलाज करता येणार नाही.

**शासनाला आणि अधिकाऱ्यांना दिलेली हमी.**

**४.** या अधिनियमाअन्वये किंवा उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, शासन किंवा शासनाचा कोणताही अधिकारी याविरूध्द कोणताही दावा किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही करता येणार नाही.

---

शामुको.-एच ३५५-२,५५०-६-२०१२

**शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर**

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**

  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**

  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**

  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**

  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते